# लॉकडाऊन काळात अशी करा शेतमालाची वाहतुक

अमित अमर गांधले
आचार्य पदवी विद्यार्थी
विस्तार शिक्षण विभाग
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

कोरोना व्हायरसमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊनची घोषणा केली गेली. देशभरात लॉकडाऊन असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल विकण्यासाठी मोठ्या अडचणी येत होत्या. शेतकऱ्यांना घरबसल्या शेतमाल बाजारात घेऊन जाण्यासाठी किसान रथ आणि किसान रेल या सुविधा चालू करण्यात आल्या.

- **किसान रथ:**

केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी कृषी रथ ॲप चा औपचारिक शुभारंभ केला. याद्वारे सध्याच्या लॉकडाऊन परिस्थितीत तयार झालेला शेतमाल घाऊक व्यापारी किंवा बाजार समित्यांपर्यंत घेऊन जाण्यास मदत होईल.




किसान रथ ॲप गुगल प्ले स्टोअर मधून डाऊनलोड करता येईल. हे ॲप इंग्रजी, हिंदी, गुजराती, मराठी, पंजाबी, तमिळ, कन्नड आणि तेलगु या भाषेत उपलब्ध आहे. या ॲपचा उपयोग करून शेतकरी त्याच्या मोबाईल फोनवरून घरबसल्या ट्रक बुक करू शकतात. हा ट्रक त्यांच्या दारात येऊन शेतमाल बाजारात घेऊन जाईल. या ॲपमध्ये किती वजनाचा शेतमाल कुठून कुठे पाठवायचा आहे याची माहिती भरावी लागेल. त्यांनतर त्या भागात उपलब्ध असलेला ट्रक व अपेक्षित भाडे याची माहिती कळविली जाईल. एकाच दिशेने जाणारा ट्रक अनेक शेतकऱ्यांचा माल घेऊन जाऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्याला पुर्ण ट्रकचे भाडे देण्याऐवजी मालाचे जेवढे वजन असेल तेवढेच भाडे द्यावे लागेल.

या ॲपद्वारे व्यापारी आणि शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी मालवाहतूक गाड्यांची माहिती उपलब्ध होणार आहे. यात प्राथमिक पातळीवर शेतकऱ्यांच्या बांधावरून मंडी किंवा बाजार समित्या, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या खरेदी केंद्रावरून आणि गोदामे आदि माल वाहतुकीचा समावेश आहे. दुय्यम पातळीवर मंडी, बाजार समित्यांपासून राज्यांतर्गत, राज्या-राज्यांमध्ये, प्रक्रिया केंद्रे, रेल्वे स्टेशन, वेअर हाऊस आणि घाऊक व्यापारी आदि माल वाहतुकीचा समावेश आहे.

- **किसान रेल:**

केंद्र सरकारने २०२० च्या अर्थसंकल्पात किसान रेल चालवण्याची घोषणा केली होती. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी फेब्रुवारी महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान जाहीर केले होते की, शेतकरी आपला शेतमाल देशातील त्या भागात विकू शकतील ज्याठिकाणी त्याला चांगला भाव मिळत आहे. यासाठी किसान रेल्वे चालविण्यात येणार आहे. आता देशातील शेतकरी रेल्वेमार्गे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात फळे आणि भाजीपाला विकू शकतील. यासाठी १७ टन क्षमतेचे नाविन्यपूर्ण रेफ्रिजरेटर कोच जोडण्यात आले आहेत. त्यांची रचना शीतगृहासारखी असून त्यामध्ये भाजीपाला, फळे, दुध असे नाशवंत घटक ठेवण्यात येणार आहेत.

किसान रेलचा आरंभ देवळाली ते दानापूर, बिहार या मार्गाने झाला असून नाशिक रोड, मनमाड जंक्शन, जळगाव, भुसावळ, बुरहानपूर, खंडवा, इटारसी, जबलपूर, सटाना, कटनी, माणिकपूर, प्रयागराज, पं. दीनदयाल उपाध्याय जंक्शन आणि बक्सर या स्थानकावर थांबणार आहे. नाशिक आणि आसपासच्या भागात मोठ्या प्रमाणात ताजी फळे, भाज्या, कांदे आणि इतर कृषी उत्पादनांचे उत्पादन केले जाते, ज्यास इतर राज्यांत मोठी मागणी आहे. ही उत्पादने पटना, प्रयागराज, कटनी आणि सटाना यासारख्या भागात पाठविली जातील. रेल्वेमार्गातील निश्चित करण्यात आलेल्या स्थानकांवर फळे व भाजीपाला यांची लोडिंग व अनलोडिंग व्यवस्था उपलब्ध आहे. सुरवातीला आठवड्यातून एकदा ही सुविधा असेल मात्र प्रतिसाद अनुभवल्यानंतर त्यात बदल केला जाणार आहे.

निश्चितच किसान रेल एक उत्कृष्ट पाऊल आहे. कारण देशात फळे आणि भाज्या मोठ्या प्रमाणात खराब होतात, अनेकदा शेतमाल बाजारात पोहचतच नाही. अशा परिस्थितीत, किसान रेल उपयुक्त ठरेल.

लॉकडाऊन काळात शेतीला सूट दिली गेली, त्यामुळे पिकांची काढणी आणि लागवडीची कामे सुरु झाली. आता किसान रथ आणि किसान रेल या सुविधांमुळे शेतमालाची वाहतुक सुरळीत होईल. यामुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांना बांधापासून ते बाजार समित्यांपर्यंत आणि बाजार समित्यांपासून देशभरात शेतमालाची वाहतुक करता येणार आहे.

★★★

(संपर्क: +९१ ९४२१२७९९९३)